8 Feb. 2013

||श्री||

## अध्याय - १४ वा

### - गुणत्रयविभागयोग -

मागील अध्यायात आपण क्षेत्रक्षेत्रज्ञाचा विचार केला. भगवंत म्हणतात - ज्याला क्षेत्रक्षेत्रज्ञाचे ज्ञान आहे तो खरा आत्मज्ञानी! याव्यतिरिक्त जे काही आहे ती माहिती आहे ते ज्ञान नव्हे.
Information is different from knowledge.
आत्मविद्या ही खरी विद्या. परमार्थाची वाटचाल करणे आणि परमार्थाची अनुभूती येणे हे केवळ आत्मविद्येने होऊ शकते. कारण सा विद्या या विमुक्तये असे म्हटले आहे.

मनुष्य क्षेत्राच्या बाबतीत अत्यंत सावध असतो. पण तो वरपांगी सावध असतो. वस्त्राला डाग पडला तर तो काढून टाकायला तो चटकन प्रवृत्त होतो परंतु एखादा डाग अंतःकरणात असेल तर तो पुसून टाकायला माणसे सहसा तत्पर नसतात. ∴ भगवंत म्हणतात - क्षेत्रज्ञाला खऱ्या अर्थाने जाणावयाचे असेल तर अंतरंग शुद्धात शुद्ध व्हायला हवे. मनावर, बुद्धीवर अहंकाराची जी पुटे चढली आहेत, अहंकाराचा जो मळ चढला आहे तो सगळा स्वच्छ केला पाहिजे. तो जर आपण स्वच्छ करू शकलो तर मग त्या क्षेत्रज्ञाचे दर्शन होईल. ती विवेकाची दीपशिखा अंतरंगामध्ये प्रकाशू शकेल. अंतरंग उजळले की आत्मज्ञान होईल. त्या क्षेत्रज्ञाचे प्रत्यक्ष दर्शन घडेल. साधकाला अंतःकरण चतुष्टय जिंकता आले पाहिजे.

Notes

१३.३४ क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ॥

१४ वा अध्याय १३ व्या अध्यायाचा उत्तरार्ध आहे.

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | • | 2011 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | • | SEP |

१३ व्या अध्यायात क्षेत्र / क्षेत्रज्ञातील भेद जाणला त्याला भूतमात्रांची प्रकृतीपासून होणारी मुक्ती समजतात

www.madhaveeradhuveer.com

पुढे भगवंत म्हणतात - प्रकृती पुरुष जाणून घे
इथे पुरुष हा अलिप्त आहे आणि क्रिया करणारी
कोण असेल तर ती प्रकृती आहे. प्रकृति ही
नित्य त्रिगुणात्मक असते. आणि ती त्या पुरुषाशी
संयोग करते आणि मग त्रिगुण म्हणजे आपलेच
रूप आहे असे त्या पुरुषाला वाटायला लागते.
म्हणून त्रिगुणांचे आवरण काढून टाकायचे.
पुरुष हा नित्य साक्षी आहे. चैतन्यस्वरूप आहे.
या प्रकृतीवर मात करण्यासाठी कुणी ध्यानमार्गाने,
कुणी कर्ममार्गाने, कुणी ज्ञानमार्गाने, कुणी भक्ती-
मार्गाने जातात. ज्याचा जसा भाव असेल. जसा
मार्ग त्याला रुचेल, सुचेल, पचेल आणि भावेल
आणि पेलेल त्या मार्गाने त्याने जावे.

१३ व्या अध्यायापासून 'असि' पदाचे निरुपण
आहे. तिथे 'त्वम्' आणि 'तद्' पदाचा संगम आहे.
१२ व्या अध्यायात भक्तीचा तर १३ व्या अध्याया
ज्ञानाचा मार्ग सांगून झाला. आता भगवंत
त्याच्याही पुढे एक पाऊल टाकतात. क्षेत्र क्षेत्रज्ञाचे
स्वरूप समजावून घेतल्यावर प्रकृतीचे स्वरूप, तिचा
त्रिगुणात्मक पसारा, कशामुळे दिसतो? त्या त्रिगुणांचे
स्वरूप काय आहे हे सांगत आहेत. खरा जो
साधक आहे त्याने या त्रिगुणावर मात करून कसे
पुढे जावे याचे मार्गदर्शन भगवंत करत आहेत.

अर्जुनासारखा उत्तमातील उत्तम शिष्य

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

कामत्यामुळे, अत्यंत तत्पर आणि विचक्षण श्रोता मिळाल्यामुळे भगवंत सांगायला उत्सुक झाले आहेत.

ज्ञानकांड हे भक्तीपेक्षा आणि कर्मापेक्षा कठीण आहे. सर्व उपासनांच्या शेवटी आत्मज्ञान व्हावे लागते. त्याचा अनुभव यावा लागतो. परब्रह्म केवळ शब्दात सांगता येत नाही. म्हणून श्रुती म्हणते

आत्मा वा रे द्रष्टव्य। तो सांगून समजत नाही. ज्याचे त्यालाच ते दर्शन घडावे लागते.

नायं आत्मा प्रवचनेन लभ्य। असेही म्हटले आहे. प्रवचनातून सत्कर्म घडते. सन्मार्गाची दिशा मिळते. आपला भाव शुद्धातिशुद्ध होत जातो. वाईट वासना नाहीशा होतात. शुभ वासना जागृत होऊ लागतात. साधकाची कर्मे कृष्णही रहात नाहीत आणि शुक्लही रहात नाहीत. त्याच्या पलीकडे तो जातो. त्याला चैतन्याची प्रत्यक्षानुभूती येते.

निस्त्रैगुण्यो भवार्जुन - असे दुसऱ्या अध्यायात म्हटले आहे. केवळ सत्त्वगुणापर्यंत उन्नत होऊन चालणार नाही त्याच्याही अतीत होता आले पाहिजे. जो असा अतीत होऊ शकतो तोच चैतन्याशी तादात्म्य पावू शकतो. तिथे द्वैत मोडून पडते. त्याला आत्मानुभूती येते. हा बोलण्याचा विषय नाही. आत्मसाक्षात्काराचा विषय आहे.

ज्याला नाम आहे, रूप आहे त्याला कधी ना कधी तरी अंत आहेच. पण क्षेत्रज्ञ हा अनादि, अनंत आहे. तो शाश्वत, चिरंतन आहे. अज, सनातन, पुराण आहे.

www.madhavaghuveer.com

Notes

SUNDAY 28

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

सगळ्यांचा भर्ता तोच आहे सगळ्यांना धारण करणारा, सगळ्यांचे क्षेम आणि स्थैर्यही तोच आहे, म्हणून ज्ञानवंतांनी क्षेत्रज्ञाचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा. अर्जुन हा विचक्षण श्रोता आहे. जोपर्यंत कोणतीही गोष्ट अनुभूतीला येत नाही तोपर्यंत ज्ञानवंतांनी ती खरी मानू नये.

शंकराचार्य म्हणाले होते - "सगळ्या श्रुती एकत्र येऊन जर मला सांगायला लागल्या की अग्नी शीतल आहे, तरी मी मानणार नाही."

सिद्धावस्थेकडे झेपावणाऱ्या ज्या साधकाच्या मनामध्ये मुमुक्षुत्व जागलेले आहे, त्या साधकाच्या दृष्टीने हा अध्याय महत्त्वाचा आहे कारण गुणत्रयाला ओलांडून गेल्याशिवाय क्षेत्रज्ञाचे दर्शन होत नाही म्हणून हा अध्याय नेटकेपणाने जाणून घेतला पाहिजे.

गुण म्हणजे प्रेरणा आहे.

Notes

संकोचुनि काय झालासी लहान
घेई आपोशन ब्रह्मांडाचे। - संत तुकाराम

मूळमाया —— गुणमाया —— जडमाया

देह निर्वाहासाठी आवश्यक - त्रिगुण

त्रिगुणात्मक

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

ज्ञान - हालचाल (प्राणमय) —— स्थिर / जड | पिंडी ते ब्रह्मांडी

www.madhaveeraghuveer.com

६ प्रश्नोत्तरे



14 Feb 2013

॥श्री॥

१४ व्या अध्यायाची थोरवी पहिल्या दोन श्लोकात सांगितली आहे. भूयः - पुन्हा. कारण १३ व्या अध्यायात आत्मज्ञानाचा गौरव सांगून झाला आहे. पुन्हा तेच भगवंत सांगत आहेत. कारण पुन्हा पुन्हा सांगितल्यामुळे ज्ञान दृढावते. भगवंत 'परं ज्ञानं उत्तमम्' सांगत आहेत. या अध्यायात -
१. प्रकृतिच्या गुणांचा विभाग,
२. गुणांचे स्वरुप व बंधरुप कार्य
३. या गुणांच्या उत्कर्षाचे फळ
४. गुणांनी बद्ध होणाऱ्या पुरुषाला प्राप्त होणारे फळ.
५. गुणातीत असलेल्या महापुरुषाचे लक्षण.
६. गुणांना जिंकण्याचा उपाय.
या गोष्टींवर प्रकाश टाकलेला आहे.

परासिद्धी - म्हणजे श्रेष्ठ सिद्धी म्हणजेच मोक्ष.

अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ती, प्राकाम्य ईशित्व, वशित्व या आठ प्रमुख सिद्धी आहेत. यारवेरीज १० गौण सिद्धी आहेत. शिवाय क्षुद्र सिद्धी आहेत. मात्र परासिद्धी या सर्वांहून आगळी आहे.

क्षुद्र सिद्धी - त्रिकालज्ञान, स्तंभक, प्रतिस्तंभ.

कल्पक्षय आणि कल्पारंभ म्हणजे काय?

त्यातील भगवंत संकल्प कोणता हे ज्याला आत्मज्ञानामुळे समजते तो जन्ममृत्यूच्या चक्रातून पार होतो आणि मोक्षाची शाश्वत प्राप्ती करुन घेतो. सायुज्यता मुक्तीचा लाभ करुन घेतो. त्याला भगवंत परासिद्धी म्हणत आहेत.

Notes

[सलोकता] सामीपता सरूपता सायुज्यता]

पुनरावृत्ती हा दोष व्यवहारात आहे. आत्मज्ञानात नाही. कारण ते दुर्विज्ञेय आहे.

दुर्धर्षकार्यो

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

∴ पौनःपुन्येन श्रवणं कुर्यात् ।

www.madhaveeraghuveer.com

*Eid al Fitr (End of Ramadan)*

(२) एकदा ही परासिद्धी प्राप्त झाली, मनुष्य आत्मज्ञानी झाला की तो सृष्टीच्या उत्पत्तिप्रसंगी पुन्हा जन्मत नाही किंवा प्रलयकाळी व्यथित होत नाही.

मृत्यु न म्हणे हा भूपती। मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती।
मृत्यु न म्हणे हा करामती। कोंवाड आणेना।

निर्माण होणे - नाश पावणे - पुन्हा निर्माण होणे हे चक्र सातत्याने चालूच असते.

साधर्म्य - इथे समानधर्मता हा अर्थ नाही. कारण परब्रह्माचे कोणत्याही दृश्य गोष्टीशी साम्य नाही.

नसे पीत ना श्वेत ना श्याम काही।
नसे व्यक्त आव्यक्त ना नीळ काही।
म्हणे दास विश्वासता मुक्ति लाही।
मना संत आनंत शोधूनि पाही।। १५०।।

इथे तत्स्वरूपता, एकत्व अनुभवता येते हा अर्थ आहे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद्धनम्।
ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

(३) ईश्वराच्या अधिष्ठानाशिवाय ~~[illegible]~~ सृष्टीची उत्पत्ती नाही. महद्ब्रह्म म्हणजे मूळ प्रकृती

सर्ग - ब्रह्मदेवाचा दिवस ४ अब्ज ३२ कोटि वर्षे

प्रलय - ब्रह्मदेवाची रात्र " " "

माया म्हणजे परमेश्वराची शक्ती आहे. तिच्यामुळेच हे सर्व विश्व निर्माण झाले आणि भगवंतच

*Notes*

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

क्षेत्र व क्षेत्रज्ञ हे प्रकृतिनियमांचा अंगे आहेत. ही दोन्ही प्रकारचा अधिष्ठानावर - कार्य करतात



*Ganesh Chaturthi (IN), Eid al Fitr Holiday, Hari Raya Puasa (End of Ramadan) (SG)*

या सर्वांचा अधिकर्ता आहे. तोच ब्रह्मादिकांना निर्माण करतो. ब्रह्मदेवापासून ते अगदी किडा मुंगी पर्यंत सगळा पसारा तोच निर्माण करतो.

एकाकी न रमते। एकोऽहं बहुस्याम्।

त्या परब्रह्माला असे स्फुरण झाले की मी एकटा आहे पण मीच वेगवेगळ्या रुपामध्ये प्रगट व्हावे. तसे ते सृष्टीरुप प्रगट झाले आहे.

त्रिगुणात्मक मायेमध्ये चिदाभासरुपी वीर्याचे सिंचन करुन ईश्वर दृश्य सृष्टी निर्माण करतो. ही समस्त सृष्टी म्हणजेच समष्टी होय. आता व्यष्टि म्हणजेच शरीरांची उत्पत्ती कशी होते ते भगवंत सांगतात - चेतनाच्या जडाशी संयोग।

या कारणे मी पिता। महद्ब्रह्म माता।
अपत्य पंडुसुता। जगडंबरु॥

८४ लक्ष योनीतून फिरल्यावर शेवटी मानवाचा देह लाभतो. हा नरदेह दुर्लभ आहे.

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो।
बहुता जन्माच्या सेवटी। नरदेह सापडे अवचटी॥

या नरदेहाचा उत्तम उपयोग करुन घ्यावा. संतसंग जोडून लवकरात लवकर नरदेहाचे सार्थक करुन घ्यावे. क्रियमाण कर्माचे स्वातंत्र्य केवळ मनुष्याला आहे.

इतर योनींना क्रियमाण कर्माचे स्वातंत्र्य नाही. मात्र आपल्याला मिळालेल्या संधीचा लाभ करुन घ्यावा.

*Notes*

भारत - ब्रह्मविद्येच्या प्रकाशामध्ये तल्लीन

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | • | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | • | SEP |

बाकी सर्व योनी या भोगयोनी आहेत.
उद्भिज - वृक्षवेली, वनस्पती.
स्वेदज - घामातून निर्माण होणारे - उ, ढेकूण
अण्डज - पक्षी, सर्प.
जरायुज - गर्भाशयातून उत्पन्न होणारा प्राणी. त्यांच्या शरीरात सप्तधातू असतात. यांची निर्मिती स्त्री पुरुष संयोगातून होते.

आहार निद्रा भय मैथुनं च
सामान्यमेतद् पशुभिर्नराणाम्।
धर्मस्तु तेषामधिको विशेषो
धर्मेण हीनः पशुभिः समानः॥

मानवाचा देह लाभतो त्यांनाच आत्मोद्धाराचा मार्ग दिसतो. आत्मोन्नतीचे तीन संवेग आहेत. मंद, मध्य, तीव्र.

मंद संवेग आत्मोन्नतीच्या रस्त्यावर जायला प्रवृत्त करत नाही. तो सावकाश गतीने जातो.

मध्य संवेग - त्रिविध तापांचे चटके बसले की तो मूढ चित्तावरून उडी मारून क्षिप्त विक्षिप्त चित्तावर येतो. त्याला परमेश्वराची आठवण व्हायला लागते. मागील कर्मांचा पश्चात्ताप होतो.

तीव्र संवेग - ज्या साधकांना, उपासकांना सिद्धावस्थेकडे पोचायचे असते त्यांचा तीव्र संवेग असतो. त्यातून त्यांना आत्मज्ञान होते.

असा आत्मज्ञान झालेला महात्मा - ही सृष्टी

Notes

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhuveeraghuveer.com

समान आहे हे जाणतो. जे मायामय आहे ते सर्व विनाशशील आहे. त्याला प्रपंचाचे मिथ्यापण कळते. त्याला आत्म्याचा बोध होतो. तो ज्ञानी होतो.

पुढील ३४ श्लोकांमध्ये अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात. त्रिगुण - सत्व, रज, तम हे तीन गुण प्रकृतीच्या पोटीच जन्माला येतात. आत्मा हा वस्तुतः स्वतंत्र, स्वयंप्रकाशी आहे. मात्र त्याने जीवदशेत प्रवेश केला की हे त्रिगुण त्याला घेरतात आणि त्यामुळे तो जीव 'मी देह आहे' असे म्हणू लागतो. तो त्याचा ममत्वाचा अभिमान असतो त्यामुळे तो संसारबंधनात पडतो. त्याला ही प्रकृतीच खरी वाटते व त्यामागचे चैतन्य त्याला जाणवतच नाही.

या सर्व सृष्टीच्या मागे चैतन्य हे कारण आहे हे जर खरे असेल तर ते आपल्याला ~~[illegible]~~ दिसत का नाही? हा जीव बद्ध का होतो?

कांचेच्या केबिनमध्ये बसलेले साहेब सर्वांना पाहू शकतात पण इतर कर्मचारी सर्वांना पाहू शकत नाहीत कारण त्या कांचेला फिल्म लावलेली असते, त्याचप्रमाणे हे चैतन्य आणि आपण यामध्ये त्रिगुणांची पट्टी लावलेली आहे. ती थोडी बाजूला करायला पाहिजे म्हणजेच गुणातीत व्हायला हवे. तसे जर होता आले तर त्या चैतन्याचे दर्शन निश्चितपणे होईल. हे त्रिगुण असतात तरी कसे?

*Notes*

SUNDAY 4

सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्॥

[illegible] आदि [illegible] अपरिणामी, [illegible]
प्रकृतीचे गुण [illegible] करतात. [illegible]

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

www.madhaveeraghuveer.com

**5** SEPTEMBER MONDAY — Labor Day (US) — 15 Feb.2013 — 2011 — 248 - 117 • Wk - 36

अनघा

६) सत्वगुण - निर्मलता, निर्विकारता, प्रकाशकता

सत्वगुण हा स्फटिकमण्याप्रमाणे निर्मल व प्रकाशमय आहे. आमय म्हणजे व्याधि, विकार, दुःख. अनामय म्हणजे दुःखरहित. सत्वगुण स्थिर व शांत आहे. सत्वाचे दोन प्रकार - शुद्ध सत्व - शबल (मलिन सत्व)। युधिष्ठिर जेव्हा मलिन सत्वाकडे झुकला तेव्हा द्यूताला बळी पडला. म्हणून सात्विक व्यक्तींनी विशेष जागरूक रहायला हवे.

सत्वगुणाला सुखाचा आणि ज्ञानाचा अहंकार असतो. त्याचेच त्याला बंधन पडते. त्याला अष्टसात्विक भावांचा गर्व चढतो. त्यामुळे सत्वगुणाचा लाभ वरवर हिताचा वाटला तरी अंती तो बंधनात पाडणाराच आहे.

या अध्यायात गुण हा शब्द त्रिगुणांना उद्देशून वापरला आहे. मात्र संस्कृतमध्ये गुण म्हणजे दोरी असाही एक अर्थ आहे आणि दोरीचे कार्य आहे बांधणे. मग तो जाडजूड दोरखंड असो किंवा मऊ मुलायम रेशमी बंधन असो. गुण असला की बंधन आलेच. कधीकधी ते हवेहवेसे सुद्धा वाटते.

७) रजोगुण - हा कामना आणि आसक्ती यापासून निर्माण होतो. अनुकूल घडले तर अनुरागरूप आणि प्रतिकूल घडले तर द्वेषरूप असा हा रजोगुण आहे. माऊलीने म्हटले आहे.

*Notes*

दन्तैर्हीनः शिलाभक्षी निर्जीवो बहुभाषकः।
गुणवृन्दसमृद्धोऽपि परपादेन गच्छति॥

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

कुणी न येथे भक्त मांगला
जो तो पंथ चुकलेला||

8.00 रजोगुण म्हणजे अभिलाषेचे व मोहाचे कधीही
कमी न होणारे तारुण्य आहे.
9.00 अतितृष्णा - हाव - काम्यकर्माविचून दुसऱ्या कशालाही
स्पर्श करत नाही, तृष्णेची बेडी आपल्या पायात
10.00 अडकवून घेतो.
आशा नाम मनुष्याणां काचिद् आश्चर्यशृङ्खला।
11.00 यया बद्धा प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत||
देहधारी जो आत्मा त्याला देहामध्ये असताना हे
12.00 रजोगुणाचे भयंकर बंधन असते. तृष्णेमुळे आसक्ती
व आसक्तीमुळे पुन्हा तृष्णा असे दुष्टचक्र सुरुच रहाते

1.00

(८) तमोगुण - तमोगुणाची निर्मिती अविद्येतून होते
2.00 त्यामुळे माणसाला प्रमाद, आळस आणि निद्रा यांचे
बंधन पडते. प्रमाद म्हणजे जी गोष्ट करायला हवी
3.00 ती न करणे आणि जी गोष्ट करु नये नेमकी ती
गोष्ट करणे. आळस म्हणजे कार्यशक्तीचा अभाव
4.00 आणि उद्यमहीनता. निद्रा - अनावश्यक व अतिरिक्त
झोपेमुळे जडत्व येते. विस्मृती होते. वर्तमानात झोप येतात
5.00 तमोगुणाचे महाभारतातील उदाहरण म्हणजे शकुनि, कर्ण.
दुर्योधन व त्याचे भाऊ.

6.00

(९) इथे अर्जुनाला भारत (भा + रत) म्हटले आहे. जो
7.00 ब्रह्मविद्येमध्ये रत आहे असा भारत।
जीवाला बंधनात पाडण्यापूर्वी तिन्ही गुण त्याला

Notes

मनाच्या वृत्ती - Projections Calculations
Reactions.

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

www.madhaveeradhuveer.com

आगमोऽपः प्रजा देशः कालः कर्म च जन्म च।
ध्यानं मंत्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतव॥



शास्त्र, तीर्थ, पुत्र, समाज, देश, काल, कर्म, जन्म [महाभागवत]
~~ध्यान मंत्र व जातकादि संस्कार यामुळे गुण अभिव्यक्त होतात~~
काय काय करायला लावतात याचे वर्णन पुढे आहे.
सत्वगुण सुखात, रजोगुण कर्मात तर तमोगुण प्रमादात घालतो. सत्वगुण शांत व स्थिर आहे. प्रथम त्याला अभ्यासाची गोडी निर्माण होते व नंतर तो ब्रह्मविद्येकडे झेपावतो व सर्व बंधनातून मुक्त होतो.

(४०) सत्वगुण - दयाळु, द्रोह न करणारा, निषिद्ध आचरण न करणारा, धैर्य न सोडणारा, इतरांना मदत करणारा, महाज्ञानी असा असतो.
रजोगुण - लोकेषणा, दारेषणा, वित्तेषणा. अतिशय महत्वाकांक्षा, प्रसिद्धीची हाव, कीर्तिचा हव्यास, सतत क्रियाशील असतो.
तमोगुण - निद्रा, प्रमाद, आळस, क्रौर्य, दुष्टपणा या दुर्गुणांनी युक्त असतो.
हे तीनही गुण कमी-अधिक प्रमाणात सर्व व्यक्तींमध्ये असतात. मात्र कालानुसार, प्रसंगानुसार यांपैकी एक गुण वाढतो, प्रबळ होतो व तो इतर गुणांना दाबून टाकतो. पराभूत करतो. तो त्याच्यापेक्षा वरचढ ठरतो. Overtake करतो.
अशाच एखाद्या गुणाचे प्राबल्य वाढल्यामुळे खूप चांगल्या सज्जन व्यक्तीच्या हातूनही कधीकधी मोठा अपराध घडतो, आणि अत्यंत दुर्जनाकडूनही कधीकधी सत्कृत्य केले जाते.

Notes
तया संसारिकाची स्थिती। देही त्रिगुण वर्तती।
येक येता दोन जाती। निघोनिया॥

मांजरीची तीन पिले -

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

तीनही गुण संस्काररूपाने बीजावस्थेमध्ये सुप्त असतात

www.madhaveeraghuveer.com

(३६) जेव्हा चेतनता आणि बोधशक्ती उत्पन्न होते तेव्हा असे समजावे की सत्वगुण वाढला आहे. देहातील सर्व द्वारे प्रकाशित होतात. म्हणजेच सर्व इंद्रियांच्या ठिकाणी निःस्वार्थपणे काही चांगले करण्याची प्रेरणा जागली आणि बोधशक्ती निर्माण झाली की सत्वगुणाचा उदय होतो.

समर्थांनी सत्वगुणाच्या काही खुणा सांगितल्या आहेत.

परमार्थाची आवडी। उठे भावार्थाची गोडी।
परोपकारी नातडी। तो सत्वगुण॥
ऐसी भक्तीची आवडी। नीच दास्यत्वाची गोडी।
स्वयें देवद्वार झाडी। तो सत्वगुण॥

सत्वगुणाचे एक महत्वाचे लक्षण म्हणजे समाजाचे घाव, उपासक सोसत जातो. कठीण शब्द शांतपणे पचवतो. त्याचा देहाभिमान गळून जातो. विषयाची आसक्ती संपते. वैराग्य प्रबळ होऊन मायेचे स्वरुप समजते. सर्व संतांची चरित्रे ही सत्वगुणाची साक्ष देतात. प्रापंचिक आपत्तींनी जो डगमगत नाही तो सत्वगुणी होय. तुकाराम महाराजांचे उदाहरण.

परभूषणे भूषण। परदूषणे दूषण।
परदुःखे सिणे जाण। तो सत्वगुण॥

आणि ज्या धर्माच्या पालनाने सत्वगुण वाढतो तोच सर्वश्रेष्ठ धर्म होय.

Notes

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे।
मना बोलणे नीच सोशीत जावे।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसी रे नीववावे

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

16 Feb. 2013

490 376 3918

Password - Sf 8Qc

(९२) जेव्हा रजोगुण वाढतो तेव्हा लोभ आणि प्रवृत्ति वाढते. अशांती वाढते त्यामुळे मनाची चंचलता वाढते. रजोगुण हा भस्मासुरच आहे. चांगले खावे, चांगले प्यावे, दुसऱ्याचे अभिलाषाव हा रजोगुण आहे.

आरंभ म्हणजे सकाम भावनेने कर्म करणे.

रजोगुणाचे चार दोष आहेत- लोभ, प्रवृत्ति, अभिलाषा, लालसा! रजोगुणी मनुष्य केवळ सकाम भावनेनेच कर्म करतो. ∴ आरंभ म्हटले आहे.

मनाची चंचलता म्हणजे अशांती. कोणत्याही प्रकारच्या सांसारिक पदार्थांना आपल्यासाठी आवश्यक मानणे म्हणजे स्पृहा / लालसा.

रजोगुणाचे दोष प्रयत्नांनी टाळता येतात.

(९३) तमोगुण वाढला की अप्रकाश व कर्तव्यकर्म न करण्याकडे वृत्ती, प्रमाद आणि अंतःकरण मोहित करणाऱ्या वृत्ती उत्पन्न होतात.

तमोगुणाचे चार मोठे दोष.

अ - अप्रकाश - नीरक्षीरविवेक अजिबात नसणे.

ब - कर्तव्यकर्म टाळणे.

क - जे करायचे ते न करणे व जे करू नये ते करणे. अव्यापारेषु व्यापार. वानर-चापर.

ड - मोह - ममत्वाचे चिंतन.

तमोगुणी मनुष्य सत्कर्म करायला नाखूश असतो मात्र व्यभिचार, हत्या, मद्यपान चोरी इ० वाईट कर्मे

Notes

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

2538 6476

दयोर्मं नष्टे

करायला उत्सुक असतो. त्यात त्याला उत्साह वाटतो.
घुबडाला ज्याप्रमाणे अंधारातच चांगले दिसते
त्याप्रमाणे तमोगुणी माणसाला वाईट कर्मे करायला
उत्साह असतो.

सात्त्विक सत्संगी

(१४) जर सत्वगुण वाढला तर त्याचे कोणते फळ मिळते?
ज्यावेळी सत्वगुणांची वृद्धी झाली असताना हा
जीवात्मा मृत्यु पावला तर तो उत्तम कर्मे करणाऱ्यांच्या
निर्मळ अर्थात दिव्य स्वर्गादि लोकांना प्राप्त होतो.
सत्व गुण वाढला तरी मोक्षलाभ नाही मात्र
उत्तम लोकांचा लाभ निश्चित होतो.
वायुपुराणात सप्त लोक सांगितले आहेत.

१. भूलोक - पृथ्वी
२. भुवर्लोक - पृथ्वी व स्वर्ग यामधील अंतराळ
३. स्वर्लोक - सूर्य व ध्रुव यामधील लोक
४. महर्लोक - सूर्य व नक्षत्र यांचा
५. जनलोक - ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांचा.
६. तपोलोक - तपस्वी लोकांचा
७. सत्यलोक - स्वतः ब्रह्मदेवाचा

सात्त्विक माणसाला या उत्तम लोकांचा लाभ होतो.
मन - संकल्प; कर्म - फळ अशी ही शृंखला आहे.
∴ संकल्प शुभ असावा. संकल्प शुभ होण्यासाठी मनावर
नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. आणि मनावर
नियंत्रण मिळवण्यासाठी रज आणि तम यांच्यावर विजय

Notes

SUNDAY 11

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

www.madhaveeraghuveer.com

मिळवता आला पाहिजे. तसे घडले नाही तर रज-तम माजतात. असे रज-तम वाढले तर पुढे काय होते ते भगवंत सांगत आहेत.

(१५) रजोगुणाची वाढ झाली असता जर मृत्यु पावला तर तो कर्माची आसक्ती असणाऱ्या मनुष्यात जन्म घेतो. तसेच तमोगुण वाढला असता मृत झालेला पुरुष मूढ योनीत (नीच योनी) उत्पन्न होतो.

मानवजन्म दुर्लभ आहे हे जाणूनही सामान्य माणसे परमेश्वराऐवजी विषयांकडे अधिक ध्यान देतात. हे दुर्दैवी आहे. इंद्रियांचे असणारे अफाट सामर्थ्य आणि मानवाच्या ठिकाणी असणारा निश्चयाचा अभाव यामुळे माणसाचे आयुष्य संपून जाते.

पंचेंद्रियांच्या विषयांची तृष्णा ही फार मोठी असल्याने बहुसंख्य माणसे कळत नकळत त्यांचे दास बनतात. एकनाथ महाराज म्हणतात —

माणसांनी संसार जरूर करावा परंतु संसाराच्या व्यसनात सापडू नये.

उपभोग हे माणसासाठी असतात. माणूस हा उपभोगासाठी नसतो. म्हणून उपभोग कोणत्या सीमारेषेपर्यंत घ्यायचे याचा विवेक माणसाला करावा लागतो. विषयांचे अतिरिक्त सेवन करणाऱ्या माणसाला विषय म्हणजे विष असा धोक्याचा इशारा नाथांनी दिला आहे.

*Notes*

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

आपली शरीरप्रकृती उत्तम रहावी एवढेच पंचेंद्रियांचे विषय सेवन करावे. नाहीतर मर्यादेपलीकडे गेले तर त्यांचे विष होते. विष माणसाला एकदाच मारते तर विषय पुन्हा पुन्हा मारतात. व्यसनी माणसाला स्वतःचे अधःपतन बघावे लागते. शिवाय नरकयातना भोगाव्या लागतात. आवश्यकतेपेक्षा अधिक धनाची इच्छा करु नये कारण ते दुःखदायक ठरते. धन हे उपजीविकेसाठी असणारे साधन आहे, साध्य नाही.

अर्थानामर्जने दुःखं अर्थानाम् रक्षणे दुःखम् ।
आये दुःखं व्यये दुःखं धिगर्थाने कष्टसंश्रिताने ॥

याचा अर्थ प्रापंचिक माणसाने पैसा मिळवू नये असा मात्र नाही. तर देव, ऋषी, पितर सर्व प्राणिमात्र, भाऊबंद हे सर्व संपत्तिमध्ये वाटेकरी आहेत. याची जाणीव माणसाला असली पाहिजे नाहीतर कितीही उपभोग घेतला तरी कामाचे शमन होत नाही. धनाचा विनियोग उत्तम प्रकारे धर्म्य मार्गाने करावा.

धर्माय — यशसे — अर्थाय — स्वजनाय — कामाय असा क्रम असावा. आपण तो उलटा करतो. सर्व धन उपभोगून जर थोडे उरले तर धर्माची आठवण होते.

कामाच्या पाठोपाठ क्रोध व क्रोधाच्या पाठोपाठ लोभ येतोच. लोभ म्हणजे अतिकृपणता आणि मद म्हणजे माजोरीपणा. त्यापाठोपाठ येतो द्वेष आणि मत्सर. दुसऱ्याचा द्वेष करणे म्हणजे अंतरात्म्यातील परमेश्वराचाच द्वेष करणे परंतु द्वेषाने आंधळा

Notes झालेल्याला हे कळत नाही.

www.madhaveeraghuveer.com

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

सामान्य माणसाच्या ठायी अहंता आणि ममता दोन्ही असतात. त्या दोन्हीचे लग्न होऊन त्यांच्या पोटी मोह जन्माला आला असे नाथ गमतीने म्हणतात. मोह – विचारशून्य अवस्था, द्विधा.

जे नाही ते आहे असे वाटणे म्हणजे भ्रम. मृगजळ हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

इतक्या रिपुंनी मानवावर घाला घातला की तो अत्यंत तामसी होतो. परंतु समाजाला फसवण्यासाठी आपण सात्त्विकतेचे पुतळे आहोत असे ढोंग तो करतो. यालाच शास्त्रकारांनी दंभ असे म्हटले आहे. अशा लोकांची भक्ती ही लोकांना ठकवण्यासाठी असते.

दांभिक लोक उगाचच वाद घालतात. योग्यता नसताना लोकांनी मान द्यावा असे त्यांना वाटते.

ह्या महारिपुंपैकी प्रत्येक जण बलवान आहे. एकेकापे अनर्थीय। ह्यातही काम क्रोध जिंकणे हे सर्वात कठीण आहे. एका जन्मात हे सर्व शत्रू जिंकता येण्यासारखे नाहीत. पण भक्तीयोगाचा आश्रय करून उपासनेला दृढ चालवून, प्रयत्नात खंड न पाडता साधना करावी. जसजसा अभ्यास दृढ होत जाईल आणि अंतःकरण केवळ परमेश्वराला स्थान देण्यासाठी उत्सुक असेल तेव्हा हे सर्व शत्रू हळूहळू का होईना पळ काढतील. त्यासाठी मनोविजय आवश्यक आहे. त्रिगुणात्मक होण्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनावर विजय मिळवणे.

*Notes*

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhuveeraghuveer.com

मन आणि चित्ताचे विषय जसे असतील तसे व्यक्तिमत्व बनते. मनुष्य विषयांमध्येच लिप्त राहिला आणि ऐहिक सुखासाठीच धडपडला तर त्याचे फळ दुःखाचेच मिळते पण जर का मन व चित्ताचे विषय ईश्वरविषयक म्हणजे परोपकाराचे असतील तर त्या मनुष्याचे व्यक्तिमत्व उंचावते.

त्रिगुणांचा प्रभाव कर्मावर असतो. त्यामुळे प्रत्येक गुणापासून कोणते फळ मिळते हे भगवंत स्पष्ट करतात.

सात्त्विक कर्म - सुख, ज्ञान, वैराग्य.
राजस कर्म - दुःख
तामस कर्म - अज्ञान.

सत्त्वगुण वाढला की पुण्यकर्मांची गोडी वाढते.
रजोगुण वाढला की काम, आसक्ती, लोभ वाढतो.
तमोगुण वाढला की बुद्धी मूढ होते. माणसाचे राक्षसात रूपांतर होते.

तामस - अज्ञान, मोह, अपरिपक्वता, दुश्चरित्र, निद्रा, भय, शुभकार्यात रोज पहाणे.

राजस - संताप, खिन्नता, युद्ध करणे, ममत्व, चहाडी करणे, ऐश्वर्य, भांडण, खोटे बोलणे, व्यर्थ खर्च करणे, ईर्ष्या, मर्मभेदी बोलणे.

सात्त्विक - आनंद, प्रसन्नता, उन्नती, प्रकाश, निर्भयता, संतोष, श्रद्धा, अहिंसा, चातुर्य पराक्रम, प्रावीण्य

*Notes*

www.madhaveeraghuveer.com

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

सूर्योदय झालेला पाहून दुराचारी माणसांना भय वाटू लागते. रस्त्याने चालणारे वाटसरू दुःखी व संतप्त होतात कारण सूर्य हा सत्त्वगुण-प्रधान आहे. सूर्यप्रकाश हा सत्त्वगुण आहे. त्याचा ताप हा रजोगुण आहे आणि अमावस्येला लागणारे ग्रहण हे तमोगुणाचे कार्य आहे.

असे हे त्रिगुणांचे उत्तम विवेचन आहे. तेव्हा मानवाने रजोगुण व तमोगुण कमी करावा व सत्त्वगुण वाढवावा आणि शेवटी सत्त्वगुणाच्याही अतीत होऊन मुक्ती मिळवावी.

(१७) सत्त्वापासून ज्ञान, रजोगुणापासून लोभ आणि तमोगुणापासून प्रमाद व मोह उत्पन्न होतात. राजस क्रिया बाहेरून मोहमयी दिसतात. पण आतून दुःखकारकच असतात. कडुलिंबाच्या लिंबोळ्या वरवर दिसायला आकर्षक परंतु आत विषमय असतात.

तात्पर्य - रजोगुण व तमोगुण मानवाचे अधःपतन घडवतात तर सत्त्वगुण माणसाला आत्मोन्नत करून ज्ञानाकडे वळवतो. सर्व सृष्टीची रचना त्रिगुणात्मक आहे. त्या त्या गुणाचा प्रभाव असणाऱ्या जीवाला मृत्युनंतर कोणती गती मिळते?

(१८) सत्त्वगुणी - गंधर्व, पितृ, देवादि, सत्यलोक योनीत.
रजोगुणी - मृत्युलोकात वारंवार जन्म.

*Notes*

(१९) कश्चित् धीरः प्रत्यगात्मानम् ऐक्षत्
आवृत्तचक्षुः अमृतत्वम् इच्छन्।

www.madhaveeraghuveer.com

तमोगुणी- नीचतम योनी- याचे दोन प्रकार आहेत
१. योनिविशेष - पशु, पक्षी, कीटक, सर्प, विंचू.
२. स्थानविशेष - रौरव, कुंभीपाक, लालभक्ष, वैतरणी नरक

(१९) ज्यावेळी द्रष्टा तिन्ही गुणांच्या खेरीज अन्य कोणाला कर्ता पहात नाही म्हणजे गुणच गुणात वर्तत आहेत असे पहातो आणि या तिन्ही गुणांच्या पलीकडील मज परमेश्वराला तत्वतः जाणतो, त्या वेळी तो पुरुष माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो.

आता आत्म्याने या गुणांच्या अतीत कसे व्हावे? आपणच घेतलेल्या सोंगाने नट जसा फसत नाही त्याप्रमाणे जीवात्म्याने स्वतः गुणस्वरुप न होता साक्षित्वाने सर्व गुण जाणावेत.

का नटलेनि लाघवें। नटु जैसा न झकवे।
तैसे गुणजात देखावें। न होनिया॥ ज्ञाने. १४.२९०

त्रिगुणांमुळे जीवाची अवस्था चिखलात फसलेल्या गायीप्रमाणे होते. त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येकाने आश्रमानुकूल शास्त्रविहित कर्मे निष्काम भावनेने आचरावीत. त्यातून चित्तशुद्धी होते. चित्तशुद्धीमुळे श्रवण चित्तात ठसते. त्या श्रवणाचे चिंतन, मनन होते. मननामुळे निदिध्यास लागतो आणि नंतर आत्मसाक्षात्कार होतो.

जीवाने तटस्थ रहावे. त्यातच त्याचे कल्याण आहे. त्यामुळेच आत्मोन्नती साधता येते.

www.madhavveeraghuveer.com

Notes

SUNDAY 18

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

(२०) पिंजऱ्यातला पोपट दांडीला धरून ठेवतो. आकाशात भरारी मारण्याचे सामर्थ्य तो विसरून जातो. तसेच आपले स्वरूप विसरून जीवात्मा स्वत:ला त्रिगुणांच्या स्वाधीन करतो. घट फुटल्यानंतर ज्याप्रमाणे घटाकाश जसे आपोआप महदाकाश होते, त्याचप्रमाणे देहबुद्धी गेल्यावर आत्मस्वरूपाचे स्मरण होते.

१२ व्या अध्यायाच्या २-या श्लोकापासून ते या श्लोकापर्यंत अमृतधार बरसली आहे. हे ७३ श्लोक म्हणजे गीतेचा गाभा आहे. कारण यामध्ये गीतेतील सर्व महत्त्वाचे विषय आहेत.

१२.१३ ते १२.१९ - भक्तोत्तमाची लक्षणे.
१३.७ ते १३.११ - ज्ञानवंताची लक्षणे.
१३.५ ते १३.६ क्षेत्राची ३६ तत्त्वे.
१३.१२ ते १३.१७ - ज्ञेय (परमात्म्याची) लक्षणे.
१३.१९ ते १३.२२ - प्रकृति - पुरुष
१३.२४ ते १३.२५ - (जाणण्याचे) चार साधनमार्ग
१३.२७ - जन्ममरणचक्रातून सुटण्याचा उपाय
१४.५ ते १४.८ - त्रिगुणांमुळे पडणारे बंधन.
१४.९ ते १४.१० - त्या बंधनापूर्वी गुण काय करतात?
१४.११ ते १४.१३ त्रिगुणांची लक्षणे
१४.१८ त्यांचे फळ [illegible]

Notes: देही उत्पत्तीचे स्थूलशरीराच्या कारणरूप असणाऱ्या तिन्ही गुणांना पार करून जन्ममृत्युजरावस्था व सर्व दु:खांपासून मुक्त होऊन अमृतस्वरूप प्राप्त करतो.
त्या विद्वान पुरुषाला शरीरामध्ये असतानाच माने स्वरूप प्राप्त होऊन जीवन्मुक्तावस्था प्राप्त होते आणि प्रारब्धवशामुळे

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

शरीराचा त्याग केल्यानंतर विदेहकैवल्य प्राप्त होते.
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन। यद्गत्वा न निवर्तन्ते

www.madhaveeraghuveer.com

श्रुती - न स पुनरावर्तते । न स पुनरावर्तते । तो मुक्त होतो.



उरलेल्या श्लोकात गुणातीताची लक्षणे व आचरण आणि गुणातीत होण्याचा उपाय सांगितला आहे.

(२१) यानंतर अर्जुनाने तीन प्रश्न विचारले —
१. गुणातीताची लक्षणे कोणती?
२. गुणातीताचे आचरण कसे?
३. गुणातीत होऊन ब्रह्मस्वरूपता प्राप्त करून घेण्याचा उपाय कोणता?

अर्जुनाने दुसऱ्या अध्यायात असाच प्रश्न विचारला होता परंतु आता पुन्हा तशाच प्रकारचा प्रश्न विचारत आहे. कारण आता त्याची मनोभूमिका बदलली आहे. ज्ञानाचा व विवेकाचा दीप त्याच्या अंतःकरणात उजळला आहे. त्यामुळे प्रश्न तसाच वाटला तरी दृष्टीकोन वेगळा आहे.

(२२) सत्त्वगुणाचे कार्यरूप प्रकाश
रजोगुणाचे कार्यरूप प्रवृत्ती
तमोगुणाचे कार्यरूप मोह
या तिन्हीपैकी काहीही प्राप्त झाले असता विषाद मानत नाही आणि निवृत्ति झाली असता आकांक्षा करत नाही तो गुणातीत आहे.

ज्याप्रमाणे प्रातःकाल, माध्यान्ह, सायंकाल या तिन्ही कालांची गणना सूर्याला नसते तसाच हा महात्मा यापैकी एक वा सर्व गुण कार्यरत झाले तरी त्यांचा द्वेष करत नाही किंवा प्राप्त झाले नाही तरी इच्छा करत नाही.

Notes

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

गुणातीत- चांगले विचार यावेत /वाईट विचार जावेत यासाठी

21 SEPTEMBER प्रयत्न करत नाही. का आले म्हणून 2011

WEDNESDAY प्रश्नही विचारत नाही. तुम्ही या/जा 264 - 101 • Wk - 38

तुम्ही तुमचे काम करा. मी माझ्या स्वरूपामध्ये राहतो. मी शाश्वत, चिरंतन, कूटस्थ, नित्य, असंग, चिद्रूप आहे.

(२३) अशा गुणातीत पुरुषाची लक्षणे -

जो केवळ साक्षीरूप राहून गुणांनी विचलित होत नाही आणि गुण गुणात वर्तत आहेत असे समजून जो सच्चिदानंदघन परमात्म्याच्या ठिकाणी ऐक्यभावाने स्थिर रहातो, त्या स्थितीपासून जो चळत नाही त्याला गुणातीत म्हटले आहे.

उदासीन म्हणजे निराश नव्हे तर साक्षी किंवा अलिप्त! विश्वप्रपंच मिथ्या आहे हे त्यांनी जाणले असते त्यामुळे प्रकृतीतील त्रिगुणांनी छळले तरी तो साक्षीरूपानेच त्याकडे पहातो तो त्यात गुंतत नाही.

भगवान श्रीकृष्णाने सर्व यादवांचा नाश साक्षीभावाने पाहिला. वास्तविक पहाता भगवान श्रीकृष्ण संपूर्ण जगाच्या नियंता आहेत तरीही त्याने यदुवंशीय लोकांवर आलेल्या आपत्तींना बदलण्याची इच्छा किंवा कृती केली नाही.

महाभारतात मौसलपर्व आहे. मुसळाचे निमित्त होऊन यादवांचे परस्परांमध्ये मोठे युद्ध झाले.

महर्षी विश्वामित्र, कण्व, तपोधन नारद

सांब स्त्रीवेषात - त्याच्या गर्भातून काय जन्मेल?

मुसळ - त्यावरून युद्ध - सर्वनाश.

(२४) गुणातीताचे आचरण. वस्त्राच्या आतबाहेर जसे सुताशिवाय काहीच नसते त्याप्रमाणे चराचर विश्व ईश्वररूपच आहे असे तो महात्मा पहातो. देहाचे

(३) Notes प्रकृतीच्या स्वभावानुसार कोणता ना कोणता गुण प्रधान असणारच. त्यांना यत्किंचित विरोध न करता, तिरस्कार न करता ते जसे कार्य करतात ते पूर्णतः मनोमन मान्य करतो त्यामुळे आंतरिक संघर्ष निर्माण होत नाही. वैफल्याची शक्यता नसते.

हार × प्रहार | स्तुति × निंदा

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

माती। सोने - प्रिय - अप्रिय याचे विषय होत नाही.
Subjective value संपते.



हिरा। कोळसा - सारखेच.
पृथिव्यां त्रीणि रत्नानि...

तादात्म्य टाकून तो आत्मस्वरूपात स्थिर होतो.

जै निद्रिताचेनि अंगेशी। सापु नेणे उर्वशी।
तैसी स्वरूपस्था शरीरी। देहो नेदे ॥१४.३५६॥

गुणातीत कोणकोणत्या लक्षणांनी युक्त असतो.

अ- सुखदुःख समान - लो. टिळकांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वनाथपंत प्लेगच्या साथीला बळी पडले. पाठोपाठ चुलत भाऊ, भाचा गेले. तेव्हा सांत्वनासाठी काही लोक गेले असता लो. टिळक उद्गारले - गावची होळी पेटल्यावर प्रत्येक घरच्या गोवऱ्या जाव्या लागतात. तसेच झाले.

ब- स्वरूपात स्थिर - लो. टिळक गुडघा अतोनात दुखत असताना सिंहगड चढून गेले.

मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम्।

क- सोने माती दगड मातीसमान - तुकाराम महाराज
मान दंभ चेष्टा। हे तो शूकराची विष्ठा॥
किंवा तुमचे येर वित्त धन। ते मज मृत्तिकेसमान॥

ड- प्रिय - अप्रिय सम मानणारा - सिद्धी मिळो किंवा असिद्धी। प्रिय घडो वा अप्रिय - जो आत्मनिष्काम असतो त्याला समानच असतात.

लो. टिळक, सावरकर, शंकराचार्य, योगी अरविंद हे सर्व याप्रमाणे आचरण असणारे होते.

इ- धृती - टिळकांवर खटला भरला पण ते मर्दाप्रमाणे धैर्यशीलतेने उभे होते कारण धृती प्रबळ होती.

ई- निंदा स्तुती समान - तुकाराम महाराज.

Notes

② हे सर्व गुण, विकार - प्रकृतिजन्य / अज्ञानजन्य आहेत. परंतु 'मी' म्हणजे प्रकृतिचे कार्य नाही. तर नित्य साक्षीस्वरूप आहे. मी त्रिगुणांपासून भिन्न असणारा, त्यांना सत्ता, स्फूर्ति, चैतन्य देणारा आत्मा आहे. मी नित्योपलब्धि आत्मा आहे.

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

रामेश्वरभट्टांनी त्यांची खूप स्तुती केली.
तुका निघुन गेला तुका!
आणि मंबाजी, सालो-मालो यांनी अतिशय निंदा करुन त्यांना त्रास दिला पण या कशानेही ते व्यथित झाले नाही.

(२५) मान/अपमान - समवृत्ति
शत्रु/मित्र - अभिमानाचा त्याग
रामच कर्ता, रामच भोक्ता - समर्थ रामदास
सकाम कर्माचा त्याग करणारा तो गुणातीत.

(२६) ब्रह्मस्वरुपता प्राप्त करण्याचे एकमेव साधन म्हणजे अव्यभिचारी भक्ती होय.
भक्ती हा पाचवा पुरुषार्थ आहे.
रत्न व तेज, साखर व गोडी, कमळ व पाकळ्या, वृक्ष व फांद्या हे वस्तुत: एकच असते. त्याच प्रमाणे परमेश्वर व दृश्य विश्व स्वरुपत: एकच आहे.
समुद्राची लाट समुद्रापासून वेगळी नसते. तसा ईश्वराहून दृश्यपसारा वेगळा नाही.
भक्तीच्या पायऱ्या -
१. मी तुझा आहे - सेवकभाव
२. तू माझा आहेस - भक्ताच्या पारमार्थिक हक्क सिद्ध
३. आपण दोघे एकच आहोत - जीवात्मा-परमात्मा अद्वैताची अनुभूती येते. शिवो भूत्वा शिवं यजेत्।

Notes

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

18 Feb. 2013

(२७) भगवान या सर्वांचा परम आश्रय आहेत.
अमृत, अव्यय, शाश्वत धर्म, एकरस सुख ही सर्व त्यांचीच नावे आहेत.

विनोबाजी- गीता प्रवचने.

आत्मा स्वयंपूर्ण आहे. आत्म्याची गती ऊर्ध्वगामी आहे. परंतु एखाद्या वस्तुला जड वजन बांधले म्हणजे ती जशी खाली खेचली जाते, त्याप्रमाणे या देहाचे ओझे आत्म्याला खाली खेचते. तेव्हा कोणत्याही उपायाने देहाला व आत्म्याला पृथक करता आले तर प्रगती करणे शक्य आहे. ही गोष्ट कठीण असली तरी त्यापासून मिळणारे फळही मोठे आहे. आत्म्याच्या पायातील देहाची बेडी जर आपण तोडू शकलो तर मोठा आनंद मिळणार आहे. जो स्वतःवर राज्य करतो तो विश्वाचा सम्राट होतो.

ही सुखदुःखे अलग कशी करायची?

देह पडत असतानाही शांत, आनंदमय राहणे हे ख्रिस्ताच्या उदाहरणावरून समजू शकते. परंतु हे काम विवेकाचे आणि निग्रहाचे आहे. त्यासाठी विवेक आणि वैराग्य दोन्ही हवे.

वैद्य ज्याप्रमाणे प्रकृति तपासून उपचार सांगतो त्याप्रमाणे भगवंतांनी या १४ व्या अध्यायात आमची प्रकृति तपासून उपाय सांगितला आहे.
ज्याप्रमाणे देहाला कफ वात पित्त हे त्रिदोष तसे

Notes प्रकृतीला सत्व रज तम हे त्रिगुण व्यापून आहेत.



| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

www.madhaveeraghuveer.com

सर्वत्र या तीन वस्तुंचा मसाला आहे. तमोगुण
तमोगुणाचे भेसूर परिणाम होतात. आळस,
निद्रा, प्रमाद, आळस. उत्तमोत्तम माणसेही या
आळसाने बिघडून जातात. शरीर आळसावले की
मनोबुद्धीही आळसावतात. सर्वांनी आळस टाकून
श्रम करायला तयार राहिले पाहिजे.
समाजात खूप मोठी दरी आहे.

| खूप श्रीमंत | खूप गरीब |
|---|---|
| गंजून गंजून निरुपयोगी | झिजून झिजून निरुपयोगी |
| शरीराचा वापर कमी | मरमरतावर श्रम |

मात्र शरीरश्रमात गेलेला वेळ फुकट जात
नाही. त्याने आरोग्य लाभते. बुद्धी सतेज, तीव्र व
शुद्ध होते. विचारवंत जर उन्हात, मोकळ्या हवेत,
सृष्टीच्या सान्निध्यात मेहनत करेल तर त्याचे
विचारही तेजस्वी होतील.
★ निद्रा - वास्तविक झोप ही पवित्र गोष्ट आहे.
हा एक प्रकारचा योगच आहे. झोप शांत आणि
खोल असावी, गाढ असावी. माणूस किती वेळ
झोपला, त्याचा बिछाना कसा यावर झोप अवलंबून
नाही. बिछान्यात बराच वेळ तळमळत काढण्यापेक्षा
थोडा वेळ शांत झोप ही निश्चित लाभदायक आहे.
अर्धा तास मन लावून केलेला अभ्यास हा तीन तास
चंचल मनाने केलेल्या अभ्यासापेक्षा अधिक फळ देतो.
चांगली झोप कशी मिळवायची? तर देह सारखा

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

वापरला पाहिजे. झोप म्हणजे दैनिक मृत्युच!
प्रमाद - याचे चित्त सावध व दक्ष नसते. सारखा विसर पडतो. विस्मरण हा रोग आहे. त्याने बुध्दीला कीड लागते. जीवन पोखरले जाते.

याला जिंकण्यासाठी सतत सावध रहायला पाहिजे. जी कृती करायची ती विचारपूर्वक करा. तरच अनवधानतेचा रोग दूर होईल. अशा रीतीने तमोगुणाला जिंकायचा प्रयत्न करायचा.

• रजोगुण - तमोगुणातून रजोगुण फुटतो. फुटबॉल-प्रमाणे तमोगुण व रजोगुण जीवाला एकमेकांकडे फेकत असतात. रजोगुणी माणसाला नाना प्रकारची कामे करण्याचा हव्यास असतो. त्यामुळे कामसंग जडतो. वासनाविकाराचा वेग आवरत नाही. जे जिथे आहे ते तिथे त्याला पहावत नाही. सारखी घडामोड पाहिजे. (पान - १३८) त्याच्या अंगात खुमखुमी असते.

या माणसात स्थिरता रहात नाही. तो सारखी धरसोड करतो. त्याला सारखी हाव सुटते. तो नाना धंद्यात लुडबुड करतो. त्याला स्वधर्म असा रहात नाही. अनेक कर्मे करणे म्हणजे कर्मयोग नव्हे. पर्वताच्या माथ्यावर पडणारे पाणी जर अनेक दिशांनी वहात गेले तर ते कोठेच साठत नाही. सारे नाहीसे होते. परंतु तेच सारे पाणी एकाच दिशेने वहात गेले तर त्या पाण्याची पुढे नदी होईल. त्याचप्रमाणे माणसाने आपली शक्ती वाया न दवडता ती एकत्र करून

*Notes*

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

www.madhaveeradhuveer.com

एखाद्या कार्यात सुव्यवस्थितपणे वापरली तरच त्याच्या
हातून काही चांगले घडू शकेल.
स्वधर्माचे सतत चिंतन करून त्यात सर्व
शक्ती ओतली पाहिजे. फळाकडे लक्ष न देता
स्वधर्म आचरणे हा खरा कर्मयोग आहे. शेतात
धान्य पेरणे आणि मूठभर धान्य घेऊन कोठे तरी
फेकणे या दोन्ही गोष्टी निराळ्या आहेत.

• सत्वगुण - याच्याशी फार जपून वागले पाहिजे.
पुष्कळ समुदाय जमला असेल, नियमित करायचा
असेल तेव्हा शिपायांना आज्ञा देतात. कमरेच्या
वर गोळ्या न झाडता खाली पायावर गोळ्या झाडा.
एखादा कंदिल असेल तर
काजळी हा तमोगुण आहे.
धूळ हा रजोगुण आहे.
आणि काच हा सत्त्वगुण आहे.
पण काच फोडायची नाही तर लहानसा कागद
आड धरायचा. सत्वगुणाला निरहंकारी करायचे.
कसे? तर सत्वगुण आपला स्वभावच करून
टाकायचा. तो कोणी घटकाभर आलेला पाहुणा नाही.
त्याला घरचा करून टाकायचा. कारण जी क्रिया
कधीमधी घडते तिचा अभिमान वाटतो. जी
स्वाभाविक, रोज घडणारी गोष्ट आहे तिच्याबद्दल
विशेष काही वाटत नाही.

*Notes*

| 2011 | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEP | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

प्रथम अहंकार जिंकावा मग आसक्ती जिंकावी. जीवनात सत्त्वगुण स्थिर केल्यानंतर कधी सिद्धीच्या तर कधी कीर्तिच्या रूपाने फळ उभे राहते परंतु ते फळही लेखायचे. त्याचा उपभोग स्वत: न घेता इतरांसाठी, परोपकारासाठी करायचा.

पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः
स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः।
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः
परोपकाराय सतां विभूतयः॥

फळ खाण्यापेक्षा ते न खाणेच अधिक गोड असते. जीवनात काही मिळवण्यापेक्षा देण्याचे प्रमाण अधिक असावे. देण्यात जो आनंद आहे तो उपभोगण्यात नाही.

जीवने यावद् आदानं स्यात् प्रदानं ततोऽधिकम्।
इत्येषा प्रार्थनास्माकं भगवन् परिपूर्यताम्॥

यासाठी सतत जागरूकता हवी. धर्मराजाने शेवटी स्वर्गसुखाचे फळही लाथाडले.
असा हा अध्याय गुणातीत व्हायला शिकवतो.

उदासीन - वादिप्रतिवादिनोरुभयोः कस्यापि पक्षम् अनवलम्ब्य तद् उभयव्यापार द्रष्टा तटस्थः पुरुषः उदासीन इत्युच्यते।

वादी x प्रतिवादी यांच्या चर्चेमध्ये व्यापारामध्ये जो प्रत्यक्ष सहभाग घेत नाही. तटस्थ राहतो. कोणाचीही बाजू न घेता, ढवळाढवळ न करता

Notes अलिप्त राहतो, तो उदासीन आहे.

गुणातीत कोणत्याही गुणाच्या विकाराने विचलित होत नाही. स्वस्वरूपाच्या निष्ठेपासून ढळत नाही.
नारळाची करवंटी - आतील खोबरे - गोटा

नैव किञ्चित् करोमीति

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी

www.madhaveeraghuveer.com

दोन्ही दिसती सारखी, वर्म जाणे तो पारखी।
ज्ञानी X अज्ञानी
अज्ञानी - संसार सत्य वाटतो. इंद्रियांनी अनुभवले जाणारे सुख - दुःख खरे वाटते. कर्तृत्व भोक्तृत्व स्वतःकडे घेतो
ज्ञानी - कर्ता भोक्ता मिथ्या। भोग्य वस्तूही मिथ्या। तो आत्म्यावर कर्तृत्व भोक्तृत्वाचा अध्यास करत नाही. त्याची दृष्टी पारमार्थिक असते.

न मां कर्माणि लिम्पन्ति
न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योऽभिजानाति
कर्मभिर्न स बध्यते॥

असा याने अविक्रिय, असंग, अलिप्त असतो.

X

सुख / दुःख — यत्र शोभनानि इष्टानि खानि भवन्ति तत्सुखम्।
यत्र दुष्टानि खानि भवन्ति तद् दुःखम्।
सुखदुःखयोः समत्वं नाम चित्तस्य इष्टानिष्टभावना वैधुर्यमेव तदेव समचित्तत्वम्।

इंद्रिये - पुलकित, प्रसन्न, हर्षित - अनुकूल - सुख
अस्वस्थ, बेचैन, व्याकुळ, अप्रसन्न प्रतिकूल - दुःख

जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत प्रत्येकाला हे अनुभव येणारच. ते टाळता येणार नाहीत.

Notes

मात्र अज्ञानी मनुष्य या वृत्तिंशी 'तादात्म्य' पावतो. त्यामुळे सुखी / दुःखी होतो.
ज्ञानी विषयांच्या सान्निध्यामुळे हुरळून / खचून जात नाही. निराश होत नाही। हर्षविषादरहित होतो।



www.madhavveeraghuveer.com

National Day (NG)

In spite of all problems wise person is always happy with himself.

8.00 आत्मन्येवात्मना तुष्टः
9.00 न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य
दुःखेष्वनुद्विग्नमनाः

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

SUNDAY 2

*Mahatma Gandhi's Birthday (IN)*

| S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | OCT |